**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,**
३०२,वेक फिल्ड हाऊस,३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई४०० ००१.
दूरध्वनीक्र.०२२-२२६९४९८४,२२६९४९८५, Email:ccfmmumbai@gmail.com/dcfmangrovecell@gmail.com

**विषय:-** कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र./ल. ले/ 28 /सन २०१८-१९
फोर्ट, मुंबई ४०० ००१ दिनांक: ०१/०२/२०१९.

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे.
४. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
५. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे/ नवी मुंबई यांचे प्रतिनिधी.
६. आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई / ठाणे / कल्याण-डोंबिवली /मिरा-भाईंदर /वसई-विरार / नवी मुंबई / पनवेल /भिवंडी-निजामपूर / उल्हासनगर यांचे प्रतिनिधी. (उप आयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
७. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (विभागीय वन अधिकारी व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
८. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई.
९. पोलीस अधिक्षक,ठाणे(ग्रामीण) रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग यांचे प्रतिनिधी (पोलीस उप अधिक्षक व त्यावरील दर्जाचे पोलीस अधिकारी)
१०. सदस्य सचिव, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA)
११. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) चे प्रतिनिधी.
१२. शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO) चे प्रतिनिधी.
१३. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA) चे प्रतिनिधी.
१४. झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण यांचे प्रतिनिधी.
१५. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) यांचे प्रतिनिधी.
१६. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी
१७. नवी मुंबई एन्व्हारमेंट ऍक्शन ग्रुप यांचे प्रतिनिधी
१८. बॉम्बे एन्व्हारमेंट ऍक्श्न ग्रुप यांचे प्रतिनिधी
१९. वनशक्ती (NGO) यांचे प्रतिनिधी
२०. महाराष्ट्र मच्छिमार कृती संघ यांचे प्रतिनिधी
२१. संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)

संदर्भ :- शासन निर्णय क्र. एस-३०/२०१५/अनौ.३०/प्र.क्र.४६२/फ-३,दि. १६ ऑक्टोबर, २०१८.

उपरोक्त संदर्भान्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची **तिसरी** बैठक **बुधवार,** दिनांक **१६/०१/२०१९** रोजी **दुपारी ३.००** वाजता, जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय, जुने जकात घर, फोर्ट मुंबई येथे घेण्यात आली.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

सदस्य सचिव
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची ३ री बैठक**
**दिनांक १६/०१/२०१९ रोजीचे इतिवृत्त**
**जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई.**

विभागीय आयुक्त कोकण विभाग यांनी उपस्थितांचे स्वागत केले व समितीचे बैठकीस सुरवात केली. प्रथमत: मुंबई - मुंबई उपनगरे कांदळवन सनियंत्रण समितीचे दि.११.१०.२०१८ चे बैठकीचे इतिवृत्तातील विषयांवर केलेली कार्यवाही व तद्नंतर या समितीकडे प्राप्त तक्रारींवर केलेली कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे चर्चा झाली.

| तक्रार क्र. | तक्रार | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| **मुंबई, मुंबई उपनगर कांदळवन समितीच्या दि.११.१०.२०१८ चे विषयांबाबत..** | | | |
| १ | कांदळवन क्षेत्रातील डेब्रिस काढून टाकणे. | • मुंबई महापालिका व जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांनी याबाबतचा सविस्तर अहवाल अंदाजपत्रकासह पुढील बैठकीपुर्वी सादर करणेबाबत निर्देश दिलेले होते.<br>• कांदळवन क्षेत्रातील डेब्रीजची माहिती सर्व विभागांनी मुंबई महापालिकेकडे सादर केले आहे.<br>• या संदर्भात उपस्थित सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी या बाबत तपासणी करुन माहिती पुढील बैठकीमध्ये सादर करतो असे सांगितले. | मुंबई महापालिका<br>महसुल<br>वन<br>म्हाडा |
| २ | कांदळवन रोपांची लागवड व देखभाल करणे. | • कांदळवन रोपांच्या लागवडीबाबत विभागीय वन अधिकारी यांनी वन विभागाच्या क्षेत्रात अतिक्रमण काढलेले ठिकाणी डेब्रिज होते ते काढून त्या ठिकाणी कांदळवनाची रोपे लावण्याचे दृष्टीने सविस्तर अंदाजपत्रके बनविणेत येत असलेचे सांगितले.<br>• एकुण किती क्षेत्रात डेब्रीज आहेत त्याचा तपशील घेऊन प्राधान्यक्रम ठरवावा व त्या क्षेत्राचे Restoration चा कालबध्द कार्यक्रम तयार करावा असे सामितीने निर्देश दिले. | वन |
| ३ | श्री. रेजी अब्राहम, अध्यक्ष, युनायटेड असोसिएशन यांनी दाखल केलेल्या तक्रारींचीचौकशी सत्वर करून आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करणे.<br>1. लक्ष्मीनगर, मधील कांदळवन ऱ्हासाबाबत.<br>2. डिंगेश्वर मंदिराभोवतालचे क्षेत्र.<br>3. जलाराम मंदिराभोवतालचे क्षेत्र. | • संयुक्त मोजणीनूसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांनी कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दि.११.१०.२०१८ च्या बैठकीत दिल्या होत्या.<br>• या बाबत उपस्थित अपर चिटणीस यांनी बफर झोनची हद्द निश्चित करण्यात आली आहे व त्याची पुढील कार्यवाही करण्यास वन विभागास कळविले आहे असे सांगितले.<br>• परंतु बफर झोनमधील कार्यवाही हा पर्यावरण संरक्षण कायदया अंतर्गत येत असल्याने याचे अधिकार वन विभागास नाहीत.<br>• त्या अनुषंगाने समितीने SDO यांनी कार्यवाही करण्यास जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सांगितले व या बाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी देण्याबाबतचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | विविध अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय कारवाई.<br>श्री. किशोर गांधी | • जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे व मुंबई महापालिका यांनी केलेले कायदेशीर कारवाईबाबतचा अहवाल सादर करण्याच्या मागील बैठकीमध्ये सूचना दिल्या होत्या.<br>• या बाबत सदस्य सचिवांनी या तक्रारीबाबत संबंधीतांवर गुन्हा दाखल झाला आहे. अधिकाऱ्यांवरिल कारवाईचा विषय हा समितीचे अखत्यारित नाही असे सांगितले.<br>• त्यामुळे समितीने या बाबत पोलीसांमार्फत चौकशी मध्ये जे आरोपी आढळतील त्यांचेवर नियमानुसार कार्यवाही करणेत यावी व त्यानुसार सदर विषय वगळण्यात यावा असे ठरविले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे<br>मुंबई महापालिका |
| ५ | कुंभारकला भूखंड येथील<br>C. कार्तिक शेट्टी भूखंड माफियांचे अतिक्रमण. | • चारकोप सर्वे क्र. ४१ येथील अनधिकृत झोपडी निष्कासनाची कार्यवाही बाबत तसेच सदर जमिन ही वेटलॅन्ड व बफर झोनमध्ये आहे किंवा कसे याबाबत अहवाल सादर करण्याच्या सुचना मागील बैठकीमध्ये दिल्या होत्या.<br>• त्या नुसार जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी दि. ३१.०७.२०१८ रोजी त्यांचा अहवाल सादर केला असून तेथे पाणथळ व कांदळवन नसल्याचे सांगितले.<br>• सदर क्षेत्र पाणथळ अथवा कांदळवन नसलेची खात्री करून विषय बंद करणेत यावा. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे<br>मुंबई महापालिका |
| ६ | तक्रारीसाठीचे संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत.<br>१.मार्वे (INS हमला)<br>२.मालाड (प), लगुन रोड व चारकोप तक्रार क्र. २८/२०१७, ४४ ते ४८ / २०१७ | • पोलिसांनी न्यायालयातून मुळ कागदपत्र मागवुन व तपासणी करून केलेले कार्यवाही बाबत अहवाल सादर करणे.<br>• समितीच्या बैठकीमध्ये INS हमला बद्दल झालेल्या चर्चेनुसार पूर्वी FIR दाखल झाला त्यामध्ये नेवीच्या अधिकाऱ्यांचा सहभाग होता का ? याबाबत पोलीस चौकशी चालू आहे.<br>• तसेच ही जागा खाजण जमीन असून ती २५-३० वर्षापूर्वी नेवीला दिली होती, परंतु त्या जागेची रक्कम न भरल्या कारणाने अजूनही ती जागा राज्य शासनाच्या नावावर असल्याचे निदर्शनास येत आहे. जिल्हाधिकारी मुंबई यांच्या प्रतिनिधींना याचा पाठपुरावा तात्काळ करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या.<br>• सदर प्रकरणामध्ये INS हमलाचे अधिकाऱ्यांचा सहभाग आहे किंवा नाही? याचा तपास चालू असलेचे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.<br>• मालाड (प), लगुन रोड याबाबत अद्याप अहवाल प्राप्त नसल्याबाबत अपर चिटणीस, मुंबई उपनगर यांनी सांगितले.<br>• महापालिकेमार्फत उपस्थित सहाय्यक आयुक्त यांना या तक्रारीबाबत अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे | महसूल, महापालिका , पोलिस<br><br>जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | समितीने त्यांना पुढील बैठकीमध्ये माहिती सादर करणेच्या सूचना दिल्या. | |
| ७ | कुंभारकला येथे गटार बांधणीबाबत. | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी या संदर्भात तक्रारदारासोबत आणि संबंधीत अधिकाऱ्यांना बरोबर बैठक घेण्याचे ठरविण्यात आले होते.<br>• दि.१३.११.२०१८ रोजी बैठक घेण्यात आली सदर बैठकीत महापालिका, म्हाडा व महसूल यांच्या मार्फत एकत्र स्थळ पाहणी करण्यात आली आहे परंतु अद्याप अहवाल प्रलंबित असल्याचे अपर चिटणीस, मुंबई उपनगर यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या बाबत ७ दिवसात अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | मुंबई महानगरपालिका |
| ८ | सदस्य श्री. रेजी अब्राहम यांचे दि. १९/०४/२०१८ रोजीचे निवेदन. | • या तक्रारीबाबत मुंबई महापालिकेच्या प्रतिनिधींनी माहिती उपलब्ध नसलेचे सांगितले. यावर समितीने मुंबई महापालिकेच्या प्रतिनिधींना पुढील बैठकीमध्ये योग्य माहिती सादर करणेच्या सूचना दिल्या.<br>• तसेच या तक्रारीबाबत अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही असे अपर चिटणीस यांनी सांगितले.<br>• कांदळवन अथवा पाणथळ क्षेत्राचे संदर्भातील कायदे व नियमांचा भंग झाला आहे किंवा कसे ? यांची खात्री करून कार्यवाही करावी व अहवाल सादर करावा.<br>• त्या अनुषंगाने समितीने अपर चिटणीस यांना या तक्रारीबाबतचा अहवाल ७ दिवसात देण्याच्या सूचना दिल्या. | मुंबई महापालिका जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| ९ | श्री. रेजी अब्राहम यांचे दि. 26/05/2018 च्या इमेल वरुन मिळालेले दि. 28/05/2018 चे निवेदन. | • सदर विषया बाबत दि. ०४/०९/२०१८ रोजीच्या बैठकीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक मालवणी यांनी स्थळ पाहणी करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणे.<br>• BMC चे नोडल अधिकारी यांनी नोटीस दिलेल्या २२ प्रकरणी ५० मी ची खात्री करून केलेले कार्यवाही बाबत अहवाल सादर करणे.<br>• टिपू सुलतान ग्राऊंड, लागुन रोड, मालवणी मालाड (प.) येथील उपजिल्हाधिकारी (अ.नि.) यांच्यामार्फ़त केलेले निष्कासनाचा अहवाल सादर करणे.<br>• वरील सर्व अहवाल प्रलंबित असून कोणत्याही यंत्रणेला केलेल्या कार्यवाहीचे तपशिल सादर करता आले नाही. या विषयांचे गांभीर्य लक्षात घेऊन आवश्यक कार्यवाही तात्काळ करण्याच्या सूचना समितीने दिल्या व जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींना याबाबत निष्कासनाचा अहवाल तात्काळ सादर करण्याच्या सूचना दिल्या. | पोलिस<br>मुंबई महापालिका<br><br>जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | श्री. रेजी अब्राहम यांची दि. 31/07/2018 ची तक्रार | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांनी तक्रारदार श्री. रेजी अब्राहम व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेवून व समन्वय साधून केलेले कार्यवाही बाबत अहवाल सादर करण्याच्या सूचना मागील बैठकीमध्ये दिल्या होत्या.<br>• या बाबत दि.१३.११.२०१८ रोजी सयुक्त बैठक घेतली असलेचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांनी या विषयी केलेली कार्यवाहीचा अहवाल तात्काळ सादर कराणेच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे |
| ११ | श्री. रेजी अब्राहम यांची दि. 04/09/2018 ची तक्रार | जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांनी तक्रारदार श्री. रेजी अब्राहम व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेवून समन्वय साधून केलेले कार्यवाही बाबत अहवाल सादर करणेचे निर्देश दिले होते.<br>• या बाबत दि.१३.११.२०१८ रोजी सयुक्त बैठक घेतली असलेचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांनी या विषयी केलेली कार्यवाहीचा अहवाल तात्काळ सादर कराणेच्या सूचना दिल्या | मुंबई महानगरपालिका जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे आणि MHADA |
| १२ | श्री. रेजी अब्राहम यांची दि. २६/०९/२०१८ ची व्हॉटस् ॲप वरील व दि. ०२/१०/२०१८ ची तक्रार | • श्री. रेजी अब्राहम यांनी दि.२६.०९.२०१८ रोजी व्हॉटस् ॲप वर तसेच दि.०२.१०.२०१८ चे निवेदनाद्वारे चारकोप आर.जी प्लॉट २ बाबत तक्रार केली होती. त्याबाबत जिल्हाधिकारी यांनी तक्रारदार श्री. रेजी अब्राहम व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेवून व समन्वय साधून आवश्यक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा. तोपर्यंत म्हाडाने सर्व बांधकाम थांबवावे व याबाबत सविस्तर अहवाल सादर करावा, असे निर्देश मा. आयुक्त यांनी दिले होते.<br>• सदस्य सचिव यांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांनी दि.१३.११.२०१६ रोजी संबंधितांची बैठक घेतली तसेच संयुक्त स्थळ पाहणी झाली असून जिल्हाधिकारी यांनी सादर कलेले अहवालानुसार RG .2 प्लॉट अंशत: बाधीत होत आहे तथापी पॅगोडाचे बांधकाम कांदळवना पासून ५० मी. अंतराबाहेर असलेबाबत जिल्हाधिकारी मुबई उपनगर यांचा अहवाल प्राप्त झाला असलेचे सांगितले.<br>• तसेच याबाबत दि.११.१०.२०१८ चे बैठकीत काम थांबविण्याचे निर्देश दिले होते असे सांगितले.<br>• सदर काम कांदळवन क्षेत्रात अथवा त्याच बफर क्षेत्रात नसलेने या कामास दिलेली स्थगिती उठविणेत यावी व या कामात बफर झोन मध्ये कोणत्याही कायद्याचा अथवा उच्च न्यायालयाच्या आदेशाचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे म्हाडाचे प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेला कळविणेत यावे असे समितीने निर्देश दिले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व म्हाडा |

| कांदळवन समितीच्या तक्रारींवर झालेली चर्चा | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजेंद्र पाटील दि.१९.११.२०१८ Destructioin of mangroves due to slum encroachment and debris is dumping at mangroves behind Neminath Heights Bldg, Gaurav city, near Mayor Bungalow, Mira road east. | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी ठाणे यांच्या प्रतिनिधींनी सदर क्षेत्राची दि. २१.१२.२०१८ रोजी स्थळ पाहणी झाली आहे असे सांगितले.<br>• सदर जागेवर भराव झाला असून यापूर्वी तेथे कांदळवन होते किंवा कसे याबाबत MRSAC यांच्यामार्फत तपासणी करण्याबाबत वन विभागास कळविण्यात आले आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या जागेवर वन विभागाच्या प्रतिनिधीसोबत स्थळ पहाणी करुन सदर जागेचे GPS Reading व Geo-tagged photographs, Polygon of the site drawn on google earth, वन विभागास देण्यास सांगितले व त्या नुसार या जागेवर कांदळवन आहे किंवा कसे ते तपासण्यास सांगितले.<br>• तसेच कांदळवनावर वारंवार भराव होऊ नये त्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी CCTV कॅमेरे लावण्यास व डेब्रिज नेणाऱ्या प्रत्येक वाहनास GPS कायम स्वरुपी लावण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी ठाणे |
| ३ | श्री. झोरु भाथेना :- जूहू तारा कोळी जमात दि.२०.११.२०१८ Complaint reg the destruction of Juhu Koliwada Beach (CRZ-1/NDZ/Mangrove Forest) & Cutting of Mangorve | • या तक्रारीबाबत सदस्य सचिवांनी सदर जागेचा स्थळ पाहणी अहवाल MCZMA यांना सादर करण्यात आला आहे असे सांगितले.<br>• मा. उच्च न्यायालयात याबाबत याचिका दाखल झाली असून त्याची पुढील सुनावणी दि. १७ जानेवारी २०१९ रोजी असल्याचे सांगितले.<br>• मा. उच्च न्यायालयाने कांदळवन कक्षास प्रकल्प स्थळाची पाहणी करुन अहवाल सादर करणेचे निर्देश दिले होते.<br>• सदरचा विषय मा. उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर |
| ४ | दि ब्लू - दि.२१.११.२०१८ Wetland and Mangrove Destruction in Mira road | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी ठाणे यांच्या प्रतिनिधींनी सदर जागेवर तक्रारदाराला संपर्क केला असता त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही<br>• त्यामुळे तक्रारदाराला मेलद्वारे देखील कळविण्यात आले असून सदरची तक्रार मोघम स्वरुपाची असल्याचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तक्रारदाराकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे ही तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले. | १. मिरा-भाईंदर महानगरपालिका, ठाणे<br>२. जिल्हाधिकारी ठाणे, |
| ६ | श्रीमती श्वेता भट — दि.२३.११.२०१८ Destruction of Mangroves at Pahadi Goregaon, Survey no. 161, CTS 1 | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी सदर जागेवर स्थळपाहणी झाली असून तेथे ५० मिटर च्या आत विकसकाचे काम चालू होते त्यामुळे गुन्हा दाखल केलेला आहे असे सांगितले होते.<br>• सदरचे क्षेत्र वन विभागाकडे हस्तांतरीत केले असल्यामुळे त्यांनी वनपरिक्षेत्र यांच्याकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे असे सांगितले. | १. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर,<br>२. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • सदस्य सचिवांनी हे क्षेत्र वन विभागाचे अखत्यारितील नसलेचे सांगितले.<br>• समितीने सदर जागेतील भराव टाकणाऱ्यांवर जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींना व पोलीसांना पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत कारवाई करणेचे निर्देश दिले. | |
| ७ | श्री. मंगेश गांधी दि.२३.११.२०१८ वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार KMC-1<br>Debris dumping in Gorai creek Mangroves | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी सदर जागेची स्थळ पहाणी झाली असून संबंधीतांवर गुन्हा दाखल केला आहे असे सागितले.<br>• सदरचे क्षेत्र हे कांदळवन कक्षाच्या ताब्यात असल्याने सदर तक्रार दि.१४.०१.२०१९ रोजी कांदळवन कक्षाकडे पाठविल्याचे जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी सांगितले.<br>• त्याअनुषंगाने समितीने वन विभागास पुढील कार्यवाही करण्यास सांगितले तसेच जरी वन विभागाचे क्षेत्र असले तरी पर्यावरण संरक्षण कायदया अंतर्गत गुन्हा दाखल करण्याचे अधिकार महसूल विभागाला असल्याबाबत व त्यानुसार कारवाई करणेबाबत निर्देश दिले. | १. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>२. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक.मुंबई. |
| ८ | श्री. बी.एस. यादव- दि.२६.११.२०१८ वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार KMC-2<br>Mangrove Destruction | • या तक्रारीबाबत उपजिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी स्थळ पाहणी झाली असून तेथे यापूर्वी भरणी झाली असून नव्याने पुन्हा भरणी झालेली असल्याने सदर जागेवर कांदळवन आहे किंवा कसे यांबाबत कांदळवन कक्षाकडून अहवाल प्रलंबित आहे असे सांगितले.<br>• अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी हे क्षेत्र वन विभागाची नसून खाजगी असल्यामुळे कांदळवन कक्षाद्वारे तांत्रिक सहकार्य देण्यात येईल परंतु कार्यवाही जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना करण्यास सांगितले.<br>• समितीने सदर क्षेत्राची तपासणीकरून पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी करावी असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| ९ | श्री. जयेश गुप्ता – दि.२४.११.२०१८<br>Destroying mangroves in the CRZ Creek ara of Sabe-Desai-Khardi Gaon, Thane. | • या तक्रारीबाबत तहसिलदार ठाणे यांनी दि. १४ जानेवारी २०१९ रोजी अहवाल सादर केला आहे.<br>• सदर ठिकाणी खाडीलगतच्या भागात महानगरपालिका ठाणे यांचेमार्फत घनकचरा टाकण्याचे काम सरु असल्याने तेथे भराव होत असल्याचे सांगितले.<br>• सदर ठिकाणी आज रोजी कांदळवनाचे नुकसान झालेले नसून पूर्वी या जागेवर कांदळवन आहे किंवा कसे याबाबत तपासणी करावी लागेल.<br>• तसेच सदर डेब्रीज टाकल्यामुळे यापवूी मुंब्रा तलाठी सजा दिवा यांचेमार्फत ठाणे महानगरपालिका यांचेकडील संबंधीत ठेकेदार गौडा शेट्टी यांचेवर मुंब्रा पोलीस स्टेशने येथे गुन्हा दाखल झाला आहे असे सांगितले.<br>• या क्षेत्रात कांदळवन होत अगर कसे? याची तपासणी करून पुढील कार्यवाही करून अहवाल सादर करणेचे निर्देश दिले. | १. जिल्हाधिकारी ठाणे आणि<br>२. आयुक्त ठाणे महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | श्री. शैलेश जोशी व इतर 9- दि.२५.११.२०१८ Mangroves at Charcop | • श्री. शैलेश जोशी व इतर यांनी चारकोप येथील कांदळवनावर केलेला भराव व कचरा काढून स्वच्छ करण्याबाबत व तेथे भिंत बांधण्याबाबत विनंती केली होती.<br>• त्यामुळे समितीने या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व कांदळवन कक्षाने सदर क्षेत्राची पहाणी करुन कांदळवन स्वच्छतेबाबत आवश्यक कार्यवाही करुन कुंपण भिंतीचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे तसेच कुंपण भिंती चे काम करण्यासाठी MCZMA ची परवानगी घेतली आहे. या क्षेत्रात स्वच्छतेचे काम चालु असून कुंपण भिंतीचे काम करणेत येत असलेचे विभागीय वन अधिकारी यांनी सांगितले.<br>• समितीने सदरचे काम तात्काळ पुर्ण करण्याच्या सूचना विभागीय वन अधिकारी यांना दिल्या व ही तक्रार बंद करण्याच्या सूचना दिल्या. | १ जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>२. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक.मुंबई. |
| ११ | श्री. सुमित पाटील - दि.२९.११.२०१८ Destruction of Mangroves | • या तक्रारी संदर्भात निवासी उप जिल्हाधिकारी मुंबई यांनी दि. १७.१२.१०२८ रोजी सदर जागेवर स्थळ पहाणी झाली असून तेथे कांदळवनाचे कोठेही नुकसान झालेले नाही असे सांगितले.<br>• जिल्हाधिकारी मुंबई शहर यांनी दि.१०.०१.२०१९ चे पत्राने अहवाल सादर केला असून कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही असे सांगितले. त्यांमुळे सदर तक्रार बंद करणेत यावी. | जिल्हाधिकारी, मुंबई शहर. |
| १२ | श्री. स्टॅलिन डी व श्री. लुक मेंन्डीस दि.३०.११.२०१८ Mangroves under threat at Bandra east below Mahim-Sion link way. | • सदर तक्रारीबाबत स्थळपाहणी झालेली नाही. ती तात्काळ करावी व आवश्यक कार्यवाही करून अहवाल सादर करावा | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई. |
| १३ | श्री. अमित शुक्ला - दि.०१.१२.२०१८ Debris on Water Body | • या तक्रारी संदर्भात समितीने तहसिलदार ठाणे यांनी स्थळ पाहणी झाली असून नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयाच्या उत्तरेकडील मागील जागेपासून ते अपोलो हॉस्पीटल उड्डाण पुलाच्या समोरील जागेची पाहणी केली असता सदर कांदळवनाच्या क्षेत्रात कोठेही डेब्रीजचा भराव केलेला नसून कांदळवनापासून ५० मीटर पेक्षा जास्त अंतरावर मोकळया जागेमध्ये डेब्रीज टाकलेले आहे. सदरच्या डेब्रीजमध्ये कोठेही पाणी साठा असल्याचे दिसून येत नाही. सदरची जागा ही पाण्याच्या जागेपासून दिड मीटर उंचीवर आहे. सदरचे डेब्रीज कोणी टाकले याबाबत माहिती प्राप्त नाही व सदरची जागा कोणाच्या मालकीची आहे याचा बोध होत नाही असे सांगितले.<br>• याबाबतचा चौकशी अहवाल समितीस सादर करणेत यावा. तसेच स्थळपाहणी तक्रारदार यांचे समवेत केलेस तक्रारीचा निपटारा तात्काळ होऊ शकेल अशा सुचना दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे, जि. ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | श्री. एश्ले लोबो दि.०२.१२.२०१८<br>Mangroves being cut and house being build at Bandra | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी ही तक्रार माहिम रेल्वे स्टेशनच्या हद्दीत असल्याने ही तक्रार दि.१४.०१.२०१९ रोजी जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्याकडे वर्ग करण्यात आली आहे असे सांगितले.<br>• समितीने जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या प्रतिनिधींना या तक्रारीबात तात्काळ चौकशी करून आवश्यक कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, मंबई उपनगर, मुंबई.<br>२. जिल्हाधिकारी, मुंबई शहर. |
| १५ | श्री. रेजी अब्राहम –<br>दि.०३.१२.२०१८<br>Johny garage/ ICCU franchisee another illegal construction in the ever growing list of such illegal structures in Charkop Village | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी स्थळ पाहणी झाली असून SDO यांनी दिलेल्या अहवालानुसार गॅरेजपासून १०० ते १२० मीटर अंतरावर कांदळवन असून कांदळवनाची तोड झालेली नाही तसेच ते कांदळवनापासून ५० मी. अंतराबाहेर असलेचे सांगितले.<br>• समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना या तक्रारीबाबतचा अहवाल समितीस सादर करण्याबाबतच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी, मंबई उपनगर |
| १६ | श्री. धिरज परब –<br>दि.०३.१२.२०१८<br>मीरा भाईंदर महापालिकेने भाईंदर पश्चिम येथे सुभाषचंद्र बोस नावे कांदळवन, पाणथळ व सीआरझेड बाधित क्षेत्राचा ऱ्हास चालवल्या बाबत | • समितीने मिरा-भाईंदर येथील तक्रारींबाबत उप समिती स्थापन करण्याचे मागील बैठकीत निर्देश दिले होते.<br>• त्यानुसार समितीने मिरा-भाईंदर परिसरातील धिरज परब यांनी दिलेल्या सर्व तक्रारींवर स्थळ पाहणी व चोकशी करून अहवाल सादर करण्यासाठी SDO ठाणे, विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक,श्री. स्टॅलिन डी व श्री. डेबी गोऐंका या सदस्यांची उपसमिती स्थापन करणेचे निर्देश दिले. या उपसमितीने तारिख व वेळ निश्चित करुन मिरा-भाईंदर येथील कांदळनाच्या सर्व तक्रारींबाबत महापालिका प्रतिनिधी व श्री. धिरज परब यांच्यासोबत १५ दिवसात स्थळ पाहणी करून समितीस अहवाल सादर करावा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे नोडल अधिकारी यांनी उपसमितीचे कामकाजाचा समन्वय साधण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, ठाणे |
| १७ | श्री.धिरज परव दि.०५.१२.२०१८<br>सेव्हन इलेव्हन हॉटेल कं. ने मीरा रोड कनकिया येथे कांदळवनाची तोड करुन माती भराव व कुंपण भिंत बांधकाम केल्याबाबत. | | |
| १८ | उत्कर्ष सार्वजनिक मित्र मंडळ वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार KMC-3 दि.०३.१२.२०१८<br>Mangroves Cutting in Gorai Sector 2 | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी सदर जागेवर स्थळ पहाणी झाली असून FIR दाखल झाली आहे असे सागितले.<br>• सदर जागेची स्थळ पाहणी झाली असून तेथे स्मशानभूमिच्या कंपाऊंड भिंतीला लागुन कांदळवनाला लागून डेब्रिज आणि कचरा टाकलेला आहे असे सांगितले.<br>• समितीने मुंबई महानगरपालिकेने या क्षेत्रात डेब्रीज काढून कांदळवन लागवड करून क्षेत्राचे Restoration करावे असे निर्देश दिले. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. मुंबई महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.०९.१२.२०१८<br>Mangrove destruction across Uran-1 | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींनी याबाबत National Highway च्या ब्रिज चे काम चालू होते त्यामुळे पाण्याचा प्रवाह थांबला होता. तथापी आता पाण्याच्या प्रवाह पुर्ववत केला आहे असे सांगितले.<br>• समितीने या बाबत कांदळवनाचे नुकसान झाल्याने संबंधीत कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिल्या.<br>• याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा. | १. जिल्हाधिकारी, रायगड जि. रायगड<br>२.सिडको,नवी मुंबई. |
| २१ | श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार<br>दि.०९.१२.२०१८<br>Sion Panvel Highway work damaging Mangroves. | • ही तक्रार सायन पनवेल हायवे येथील असल्यामुळे ही तक्रार ठाणे यांना पाठविण्यात आली आहे असे जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनीधिंनी सांगितले.<br>• समितीने जिल्हाधिकारी ठाणे यांनी सदर तक्रारीबाबत स्थळपाहणी करून योग्य ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे |
| २२ | श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार<br>दि.०९.१२.२०१८<br>Mangrove destruction across Uran-2 | • या विषयी झालेल्या सविस्तर चर्चेमध्ये द्रोणागिरी उरण परिसरातील कामांमुळे कांदळवनाचा ऱ्हास होत असलेचे व पाणथळ क्षेत्रात भराव टाकला जात असलेचे समितीचे निदर्शनास येत आहे.<br>• उरण येथील क्षेत्र हे अतिशय महत्वाचे क्षेत्र असून तेथे पाणथळ क्षेत्र मोठया प्रमाणात असून त्याचे संरक्षण करणे अत्यंत महत्वाचे आहे असे संचालक, BNHS यांनी सांगितले.<br>• समितीने या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ सविस्तर चौकशी करावी व चौकशीमध्ये कांदळवनाचा ऱ्हास होत असलेचे अथवा पर्यावरणीय मान्यता (Environment Clearnace) मधील अटींचे उल्लंघन होत असलेचे निदर्शनास आलेस ही कामे तात्काळ बंद करण्यात यावीत असे समितीने निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, रायगड |
| २३ | श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार<br>Mangrove destruction across Uran-3 | | |
| २४ | श्री. दिपक कामथ - दि.०९.१२.२०१८<br>Potential illegal work near mangroves within Chheda Nagar area | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी तहसिलदार यांच्यामार्फत सदर जागेची स्थळ पहाणी झाली असून तेथे मोठया प्रमाणात मातीचे ढिगारे आहे ते काढण्यासाठी पत्र देण्यात आले आहे असे सांगितले.<br>• तसेच वन विभागामार्फत वनक्षेत्रपाल मध्य मुंबई यांनी केलेल्या स्थळ पहाणीनुसार Buffer Zone मध्ये काम चालू असल्याचे दिसून येते असे सांगितले.<br>• समितीने या ठिकाणी जे अनधिकृत काम चालू आहे ते थांबविण्यास सांगितले व तेथील अतिक्रमण हटविण्यास सांगितले व तेथील पाण्याचे प्रवाह पुर्ववत करण्यात यावेत असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | अज्ञात व्यक्ती - दि.०९.१२.२०१८<br><br>वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार<br>KMC-6<br>Destruction of Mangroves. | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्यामार्फत स्थळ पाहणी झाली असून तेथे कांदळवनाची तोड झालेली नाही असे सांगितले, परंतु या ठिकाणी यापूर्वी कांदळवन होते किंवा कसे याबाबत वन विभागाकडे दि.१५.०१.२०१९ रोजी अभिप्राय मागविण्यात आला आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| २६ | श्री. विनोद पुन्शी दि.११.१२.२०१८<br>Dumping of Debris on DPS Road within 50 meters of mangroves. Sector - 52, Nerul, Navi Mumbai, | • समितीने या तक्रारीबाबत नवी मुंबई महापालिकेने सदर क्षेत्राचे Restoration बाबत आवश्यक कार्यवाही करुन अहवाल सादर करावा.<br>• सिडको यांनी या पूर्वी स्थळ पाहणी झाली असून पुन्हा डेब्रिज टाकण्यात आले असेल तर ते पुन्हा स्थळ पाहणी करण्यात येईल असे सांगितले.<br>• या बाबत तक्रारदार श्री. विनोद पुन्शी यांनी सदर जागेवर डेब्रिज टाकण्यासाठी परवानग्या असतील तर त्या कोणी दिल्या त्याची प्रत समितीपुढे सादर करण्यास त्यांनी सिडको यांना सांगितले.<br>• सिडको यांच्या प्रतिनिधींना या बाबत कोणत्याही परवानग्या दिलेल्या नाहीत असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तक्रारदार श्री. विनोद पुन्शी यांच्या सोबत सदर क्षेत्राची स्थळ पाहणी व आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. | १. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई.<br>२. सिडको, नवी मुंबई. |
| २७ | श्री. डेबी गोएंका - दि.१२.१२.२०१८<br>Destruction of mangroves by INS Hamla at Marve | • या तक्रारीबाबत समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी INS हमला येथे कांदळवनापासून ५० मिटरच्या आत भराव करुन खेळाचे मैदान तयार केल्यामुळे २०१६ मध्ये त्याच्या Contractor वर FIR दाखल केला आहे असे त्यांनी सांगितले.<br>• या संदर्भात पोलिसांमार्फत फेरतपास चालू आहे.<br>• समितीने या तक्रारीचे संदर्भात पोलीसांनी तपास तात्काळ पुर्ण करुन Chargsheet दाखल करावी व पुढील बैठकीत अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| २८ | अज्ञात व्यक्ती – दि.१०.१२.२०१८<br>Mangrove Destruction | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींनी सदर जागेची स्थळ पाहणी झाली असून कांदळवनाची तोड नाही व बफर झोनमध्ये डेब्रिज टाकण्यात आले आहे असे सांगितले.<br>• त्यानुसार डेब्रिज हटविण्यासाठी महानगरपालिकेला पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.<br>• समितीने सदर जागेवरील डेब्रिज हटविण्यास सांगितले व तेथील जागेवर कांदळवनाची लागवड करण्यास सांगितले तसेच डेब्रिज टाकणाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, रायगड<br><br>२. सिडको, नवी मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | श्री. सुनिल अगरवाल – दि.१५.१२.२०१८ Destruction of Mangroves by Janakidevi Public School in Andheri (west) | • समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सदर क्षेत्राचे मुंबई महानगरपालिकेकडून restroration करुन घेण्यास मागील बैठकीत सूचना देण्यात आल्या होत्या.<br>• सदर जागेवर कांदळवनाची लागवड तात्काळ करण्याच्या सूचना समितीने महानगरपालिकेच्या प्रतिनिधींना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर<br>२. मुंबई महानगरपालिका |
| ३० | श्री. विनोद पुन्शी- दि.१७.१२.२०१८ Effluents released in mangroves raise a stink-T.O. I. Navi Mumbai Report dated 16.12.2018 | • समितीने या तक्रारीबाबत MPCB च्या नोडल अधिकाऱ्यांसोबत स्थळ पाहणी करण्यास सांगितले व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या.<br>• समितीने MPCB यांच्याकडून अहवाल मागविण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी ठाणे<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक |
| ३२ | श्री. प्रसाद खाले - दि.१७.१२.२०१८ Destruction of Mangroves at Sagarmatha Club building, Colaba. | • सागरमाथा क्लब, कुलाबा येथील कांदळवन ऱ्हासाचे तक्रारीबाबत चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करण्यास सांगितले होते.<br>• सदर ठिकाणी स्थळ पहाणी झाली असून तेथे कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही असे जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या प्रतिनिधींनी सांगितले व याबाबतचा अहवाल समितीस सादर करवा.<br>• तसेच समितीने या ठिकाणी बफर झोनमध्ये काम झाले असलेस संबंधीतांवर कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, मुंबई शहर<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक |
| ३३ | अज्ञात व्यक्ती KMC 17 - दि.२१.१२.२०१८ Mangrove filling malad West | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी तक्रार प्राप्त न झाल्याचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तक्रार पुन्हा जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना पाठविण्याबाबत सदस्य सचिवांना सांगितले.<br>• या बाबत स्थळ पाहणी व चौकशीचा अहवाल समितीस तात्काळ सादर करावा. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, मुंबई.<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक, |
| ३४ | श्री. सुनिल अगरवाल दि.१९.१२.२०१८ Systematic Destruction of Mangroves opposite D Mart , Malad Link Road , Malad | • सदर जागेची स्थळ पाहणी झाली असून तेथे कांदळवन नसल्याचे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी सांगितले.<br>• समितीने या तक्रारीबाबत वन विभाग आणि तक्रारदारासोबत स्थळ पाहणीकरुन त्या बाबतचा अहवाल १० दिवसात सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, मुंबई.<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक. |
| ३५ | श्री. सुनिल अगरवाल Destruction of Mangroves near Jaskhar wetlands in Uran | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी रायगड यांनी या तक्रारीबाबतचा अहवाल आलेला नाही असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत तात्काळ चौकशी करावी व अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, रायगड, जि. रायगड<br>२. सिडको, नवी मुंबई. |
| ३७ | श्री. नंदकुमार पवार- दि.१९.०६.२०१८ 2) Coastal road - There are | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींनी कांदळवनाची तोड झालेली नसून तेथे ब्रिजचे काम चालू आहे असे त्यांनी सांगितले. | जिल्हाधिकारी रायगड |

| | | | |
|---|---|---|---|
| | huge patches of mangroves have found dead either side of the coastal road by blocking of tidal water flow.<br>पाणथळ तक्रार निवारण समितीतील तक्रार | • समितीने सदरची स्थळ पाहणी तक्रारदारासोबत केली होती का याबाबत विचारले असता त्यांनी दूरध्वनी मार्फत संपर्क केला असता त्यांनी तक्रारीचे निवारण झाल्यामुळे त्यांनी यावर प्रतिसाद दिला नाही असे सागितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या बाबतचा अहवाल समितीस सादर करण्यास सांगितले व कोणत्याही स्थळ पाहणीवेळी तक्रारदाराला पूर्व सूचना देऊन स्थळ पाहणी करण्याचे निर्देश दिले. | |
| ३८ | श्री. नंदकुमार पवार- दि.१९.०६.२०१८<br>4) At terminal 4 of JNPT, 4550 mangroves trees (4.5 hectares) have killed needlessly. Forest department and tehsildar have confirmed the killing of mangroves. This site yet to be visited FIR must be filed against JNPT for killing of mangroves.<br>पाणथळ तक्रार निवारण समितीतील तक्रार | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींनी सदर तक्रारीबाबत JNPT आणि सिंगापूर पोर्ट यांच्यावर FIR दाखल करण्यात आला आहे असे सांगितले.<br>• तसेच सदर ठिकाणी कांदळवन आणि समुद्र किनाऱ्याजवळ मोठ्या प्रमाणात भराव केल्यामुळे पाण्याचा प्रवाह बंद झाल्यामुळे कांदळवन सुकुन गेले होते. परंतु, आता पाण्याचा प्रवाह सुरु करण्यात आला आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या क्षेत्रात JNPT मार्फत कांदळवनाची लागवड करण्याच्या सूचना दिल्या.<br>• समितीने सदर जागेवर बफर झोन च्या आत कोणतेही काम JNPT मार्फत होणार नाही याची दखल घेण्यास जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींना सांगितले.<br>• या विषयी तात्काळ सविस्तर चौकशी करावी व चौकशीमध्ये कांदळवनाचा ऱ्हास होत असलेचे अथवा पर्यावरणीय मान्यता (Environment Clearnace) मधील अटींचे उल्लंघन होत असलेचे निदर्शनास आलेस ही कामे तात्काळ बंद करण्यात यावीत असे समितीचे निर्देश आहेत.<br>• समितीने या तक्रारीबाबत कांदळवनाचे जे नुकसान झाले आहे त्याबाबतचा सविस्तर तपशील सादर करण्यास सांगितले त्यानुसार कांदळवनाची लागवड करणेत यावी व यासाठीचा निधी JNPT यांनी उपलब्ध करून द्यावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी रायगड |
| ३९ | श्री. नंदकुमार पवार- दि.१९.०६.२०१८<br>5) Reclamation on mangroves at Belpada by JNPT, for SEZ. Dumping continues in full swing.<br>पाणथळ तक्रार निवारण समितीतील तक्रार | | |
| ४० | श्री.धिरज परब दि.२८.१२.२०१८ कांदळवन व नैसर्गिक पर्यावरणाचा ऱ्हास करणारा ठराव क्रमांक ६५ प्रकरण क्रमांक ६४ महासभा दिनांक ५/९/२०१८ | समितीने मिरा-भाईंदर परिसरातील धिरज परब यांच्या सर्व तक्रारींवर स्थळ पाहणी करण्यासाठी SDO ठाणे, विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक,श्री. स्टॅलिन डी व श्री. डेबी गोऐंका या सदस्यांची उप समिती गठीत करण्यात आली असून कांदळनाच्या सर्व तक्रारींबाबत श्री. धिरज परब यांच्यासोबत १५ दिवसात स्थळ पाहणी करण्याच्या व जिल्हाधिकारी, ठाणे यांचे नोडल अधिकारी यांनी उपसमितीच्या कामकाजाचे समन्वय साधण्याचे निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे उपसमितीने स्थळ पाहणी व चौकशी करून अहवाल सादर करावा. | जिल्हाधिकारी, ठाणे |
| ४१ | श्री.धिरज परब दि.२८.१२.२०१८ भाईंदर पूर्व, जेसलपार्क चौपाटी येथील पालिकेने बेकायदा विकसित केलेल्या गुलाब बाग परिसरातील कांदळवनाच्या | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | फांद्याची तोड, पालिकेने बसवलेले बेंच, लाद्या, माती काढून येथील प्रवेश बंद करणे तसेच संबंधित यांच्यावर वन कायद्या नुसार गुन्हा दाखल करणे बाबत | | |
| ४२ | श्री.धिरज परब दि.२९.१२.२०१८ मीरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर पश्चिम प्रभाग समिती क्र 1 , मुर्धा खाडी व परिसरात सर्रास कांदळवन , सीआरझेड व पाणथळ मध्ये बेकायदा झाडे तोडून, डेब्रिस, दगड माती भराव करून मोठ्या संख्येने बेकायदा बांधकामे बाबत | | |
| ४३ | श्री. विक्रमसिंग राजपूत<br>दि. ०२.०१.२०१९<br>Mangrove destruction in Sector 19, Kamothe, Navi Mumbai | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींनी स्थळ पाहणी दि.१७.०१.२०१९ रोजी ठेवली आहे असे सांगितले.<br>• समितीने स्थळ पाहणीमध्ये वन विभागाचे प्रतिनिधींना आणि या बाबत तक्रारदारांसोबत स्थळपाहणी बाबत पूर्व सूचना देऊन सोबत घेण्याबाबतचे निर्देश दिले व त्या बाबतचा स्थळ पाहणी अहवाल समितीपूढे सादर करण्यास सांगितले. | १. जिल्हाधिकारी, रायगड<br>२.सिडको. |
| ४४ | श्री. धिरज परब दि.०९.०१.२०१९ भाईंदर पश्चिम येथे खाडी किनारी जुना धक्का असताना बाजूलाच कांदळवन व पाणथळ चा ऱ्हास करून आणखी एक जेट्टीचे बांधकाम मेरीटाईम बोर्डाने सुरु केल्याने पर्यावरणाचा ऱ्हास व लाखो रुपयांचा वायफळ खर्च चालवल्या बाबत. | • उप समितीमार्फत स्थळ पाहणीचे निर्देश समितीने दिले आहेत. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. मीरा-भाईंदर महानगरपालिका, जि. ठाणे. |
| ४५ | श्री. रेजी अब्राहम दि.१०.०१.२०१९ Request action against enforcing authorities and land mafia constructing large scale illegal chawls, commercial galas, huts etc in the periphery of charkop village in | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींना ही तक्रार चौकशीसाठी पाठविण्यात आली आहे असे सांगितले.<br>• समितीने या तक्रारीबाबत चौकशी व आवश्यक कार्यवाही तात्काळ करणेत यावी व अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक,मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| | violation of mumbai high courts orders vide PIL no 87 of 2006. | | |
| ४६ | श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.११.०१.२०१९ Request to scrap Dronagiri holding pond killing mangroves | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींनी सिडको यांचे Holding Ponds असल्यामुळे कांदळवनात पाणी जाण्यास अडथळा निर्माण झाला आहे असे सांगितले.<br>• तसेच कांदळवनात पाण्याचा प्रवाह कमी असल्यामुळे कांदळवनाची वाढ होत नाही त्यामुळे कांदळवनाची वाढ खुंटलेली आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींना या तक्रारीबाबतचा योग्य ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, रायगड<br>२.सिडको, नवी मुंबई. |
| ४७ | श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.११.०१.२०१९ Request for Mangrove Park in JNPT/Uran | (इतिवृत्तातील तक्रार क्र. ३८ व ३९ प्रमाणे कार्यवाही करावी) | १. जिल्हाधिकारी, रायगड<br>२. सिडको, |
| ४८ | श्री. सुनिल अगरवाल दि. ११.०१.२०१९ Illegal structures in Mangroves at Mini Sea Shore - Vashi | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी ठाणे यांच्या प्रतिनिधींनी तक्रार प्राप्त न झाल्याचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तक्रार पुन्हा पाठविण्याबाबत सदस्य सचिवांना सांगितले व त्यानुसार पुढील कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, ठाणे<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, ठाणे<br>३. सिडको |

- MCZMA व इतर काही विभागांचे प्रतिनिधी बैठकीत उपस्थित राहत नाहीत असे निदर्शनास येत आहे. या विभागांना त्यांचे प्रतिनिधी समितीचे बैठकीत उपस्थित राहतील याची दक्षता घेणेस कळविणेत यावे. तसेच प्रतिनिधी सातत्याने गैरहजर राहील्यास तसे मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणावेत.
- पर्यावरण संरक्षण व कायदा १९८६ मधील तरतूदी व कांदळवन तसेच बफर क्षेत्रात त्याची करावयाची अंमलबजावणी यासाठी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण आयोजित करणेत यावे व तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन देणेत यावे.
- सभेत उपस्थित असलेल्या सभासदांचे आभार मानून बैठक संपल्याचे अध्यक्षांकडून जाहिर करण्यात आले.

अध्यक्ष
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा
विभागीय आयुक्त कोकण विभाग.